




दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष १ ले ● अंक १३४ वा ● सोमवार ०२ ऑक्टोबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 134 | Date : 02/10/2023 | blow :Manday | Page 4 | Price 4


## स्वच्छता कागदावर नको, प्रत्यक्ष फिल्डवर काम दिसलं पाहिजे; मुख्यमंत्री शिंदेंचं आवाहन



मुंबई : महात्मा गांधींच्या जयंतीचं औचित्य साधून, केंद्र सरकारनं स्वच्छता हीच सेवा मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला. याचपार्श्वभूमीवर राज्यासह देशभरात 'स्वच्छता हीच सेवा' उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गिरगाव चौपाटीवर स्वच्छता केली. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवडी किल्ल्यावर तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती स्वच्छता सेवा अभियानात सहभाग घेतला. तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी अहमदाबादेत सहभाग घेतला. दरम्यान, स्वच्छता हीच सेवा मोहीमेंतर्गत राज्यात 'एक तारीख एक तास' मोहिमेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून ७२ हजारांपेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छेतेची माहीम राबवण्यात आल्याची माहिती सीएमओ कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

आज गिरगाव चौपाटी येथे सुंदर महाराष्ट्राच्या दिशेनं एक पाऊल टाकण्यात आलं. उत्साही नागरिक, विद्यार्थी यांच्या जोडीने, राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मान्यवरांनी स्वत: हातात झाडू घेऊन श्रमदान केलं आणि स्वच्छतेसाठी 'एक तारीख, एक तास' या राज्यस्तरीय मोहिमेची सुरुवात केली. सुंदर महाराष्ट्र, सुंदर भारत बनविण्यासाठी आपण टाकलेलं हे मोठं पाऊल असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे आज स्वच्छतेची ही लोक चळवळ झाली आहे, असं यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे माध्यमांशी बोलताना । पान २ वर

## विश्वचषक मराठी, हिंदीसह ९ भाषांमध्ये आवाज घुमणार

### १२० कॉमेंटटरची मांदीयाळी




नवी दिल्ली : क्रिकेटच्या महाकुंभाला ५ ऑक्टोबरपासून सुरुवात होत आहे. त्याआधी ४ तारखेला ओपनिंग सेरेमनी असेल. यावेळी सर्व दहा संघाचे कर्णधार एकत्र येण्याची शक्यता आहे. पाच ऑक्टोबर रोजी न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्यामध्ये सलामीची लढत होणार आहे. विश्वचषकाची सर्व तयारी अंतिम टप्प्यात आहे. वर्ल्ड कप सामन्यासाठी अधिकृत ब्रॉडकास्टर स्टार स्पोर्ट्स नेटवर्कने खास तयारी केली आहे. विश्वचषकात समालोचन करणाऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. मराठी, हिंदीसह नऊ भाषांमध्ये समालोचन होणार आहे. त्यासाठी तब्बल १२० कॉमेंटटरची यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये अनेक दिग्गज माजी खेळाडूंचा समावेश आहे.

विश्वचषक सामन्यावेळी अनेक दिग्गज समालोचन करताना पाहायला मिळतील. सुनील गावसकर,रिकी पॉंटिग, इयॉन मॉर्गन, शेन वॉटसन आणि वकार युनूस सारख्या दिग्गजांचा या यादीत समावेश आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजीसह नऊ भाषांमध्ये क्रिकेट चाहते कॉमेंट्री ऐकू शकतील. प्रत्येक भाषांसाठी वेगवेगळे दिग्गज आहेत. मराठी. तामिळ, तेलुगू, कन्नड़, बंगाली, गुजराती आणि मल्याळम यासारख्या भाषांमध्ये समालोचन होणार आहे.

ऑस्ट्रेलियाचा माजी खेळाडू मॅथ्यू हेडनची मुलगी ग्रेस हेडन विश्वचषकात प्रेजेंटरच्या भूमिकेत दिसेल. ग्रेसशिवाय विश्वचषकात । पान २ वर

## मुंबईसह राज्यात मान्सूनची हजेरी! परतीच्या पावसाचा धुमाकूळ



पुणे : देशासह राज्यात मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली आहे. मुंबईसह राज्यात काही भागांत परतीच्या पावसाचा धुमाकूळ पाहायला मिळत आहे. मुंबई, ठाणेसह कोकण किनारपट्टी भागात पावसाच्या सरी कोसळत आहे. शनिवारी मुंबईला पावसानं झोडपलं, तर ठाणे जिल्ह्यातही पावसाची रिपरिप पाहायला मिळाली. आजही मुंबईसह उपनगरात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दक्षिण कोकण आणि गोवा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात रविवारी मुसळधार पाऊस झाला आहे. आजही या भागांत पावसाच्या सरी । पान २ वर

## पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून तेलंगणात १३,५०० कोटींच्या विकासकामांचे उद्घाटन



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज तेलंगणा राज्यात १३,५०० कोटी रुपयांच्या अनेक विकास कामांचे उद्घाटन केले. तसेच पंतप्रधान मोदींनी नागपूर-विजयवाडा या इकॉनॉमिक कॉरिडॉरचा एक भाग असलेल्या रस्ते प्रकल्पांची देखील पायाभरणी केली. या रस्ते प्रकल्पांमध्ये राष्ट्रीय महामार्ग १६३ऋ च्या वारंगल ते खम्ममपर्यंत १०८ किमी लांबीचा चौपदरी ग्रीनफिल्ड महामार्ग आणि खम्मम ते विजयवाडापर्यंत ९० किमीच्या चौपदरी ग्रीन फिल्ड महामार्गाचा समावेश करण्यात आला आहे.वारंगल ते खम्मम आणि खम्मम ते विजयवाडा हे दोन्ही प्रकल्प सुमारे ६,४०० कोटी रुपये खर्चून विकसित करण्यात आले आहेत. राष्ट्रीय महामार्ग १६३ऋ वरील वारंगल ते खम्ममपर्यंत असणारा १०८ किमीचा ग्रीन फिल्ड या चौपदरी महामार्गामुळे या ठिकाणांमधील अंतर सुमारे १४ किमीने कमी होईल. तर खम्मम ते विजयवाडापर्यंत असलेल्या चौपदरी ग्रीन फिल्ड महामार्गमद्वारे या दोन ठिकाणांमधील अंतर सुमारे २७ किमीने कमी करण्याचे उद्दिष्ठ ठेवण्यात आले आहे.

खम्मम जिल्हा आणि आंध्र प्रदेशमधील । पान २ वर

## उजनीतील पाणीसाठा झपाट्याने वधारल्याने सोलापूरकर सुखावले



सोलापूर/प्रतिनिधीः : यंदाच्या पावसाळ्यात तीन महिने पावसाने हुलकावणीच दिल्यामुळे सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाचे सावट पसरले असताना जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या उजनी धरणातही पाणीसाठा जेमतेम असल्यामुळे सार्वत्रिक चिंता व्यक्त होत असतानाच सुदैवाने धरणाच्या वरील भागात होणा-या जोमदार पावसामुळे धरण वेगाने भरत आहे. त्यामुळे सोलापूरकर सुखावले आहेत. मागील १५ दिवसांत उजनी धरणातील पाणीसाठा वधारत असून अवघ्या २० टक्क्यांच्या पुढे न वाढणारा धरणातील पाणीसाठा आता वेगाने वाढत ४० टक्क्यांच्या दिशेने वाटचाल करीत आहे. रविवारी सायंकाळी धरणात एकूण पाणीसाठा ८४.२३ टीएमसी तर उपयुक्त पाणीसाठा २०.५१ पर्यंत वाढला होता. गेल्या तीन दिवसांत पाणीसाठा झपाट्याने वाढला असून येत्या दोन दिवसांत उपयुक्त पाणीसाठा ५० टक्के सर करण्याची आशा निर्माण झाली। पान २ वर

## ग्रामपंचायत गोगांवच्या वतीने स्वच्छता हीच सेवा

## एक दिवस-एक तास! हे अभियाना संपन्न



अक्कलकोट/प्रतिनिधीः स्वच्छ भारत हीच आपल्या देशाने महात्मा गांधीजी यांना त्यांच्या जयंतीनिमित्त अर्पण केलेली सर्वोत्तम श्रद्धांजली ठरेल. हे ध्येय साध्य करण्यासाठी रविवार दि १ आक्टोंबर रोजी सकाळी चावडी समोर व अंगणवाडी समोर स्वच्छता अभियान राबविण्यात आले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष नितीन चव्हाण, यांच्या उपस्थितीत स्वच्छता हीच सेवा एक दिवस - एक तास गावासाठी उपक्रम राबविण्यात आले पंतप्रधान मोदी यांचे अवहानानुसार स्वच्छता मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन जिथे कुठे असू तिथे स्वच्छता, साफ-सफाई करून या अभियानात भाग घेऊन संपूर्ण परीसर स्वच्छता पुर्ण केली.आपण आज जे स्वच्छतेचे काम केले आहे त्या मुळे परीसरातील नागरीक व दुकानदार यांनी दररोज आपला परीसर स्वच्छ ठेवावा असे आवाहन उपसरपंच कमलाकर सोनकांबळे. यांनी केले .

यावेळी कल्याणराव बिराजदार,सुर्यकांत जिरगे, अपाशा मुळजे, धोडेशा गुंजोटी, अंगणवाडी सेविका तेजाबाई गुरव, भाग्यश्री सोनकवडे, विजयकुमार गायकवाड प्रदीप जगताप, जगनाथ सुरवसे, यासह ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते

## सोलापुरात जिल्ह्यात यशसिद्धी महार रेजिमेंटचा ८३ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा




सोलापूर/प्रतिनिधीः विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या महा रेजिमेंटचा स्थापना दिन मोठ्या उत्साहाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सैनिक दल शाखेसन आणि सिद्धनायक ब्रिगेडच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने संपन्न झाला .सुरुवातीला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरआणि देशासाठी लढलेल्या महार रेजिमेंट मधील शूरवीर जांबाज सैनिकांना मानवंदना देण्यात आली .

यानंतर महा रेजिमेंट मधून निवृत्त झालेल्या सैनिकाचा सत्कार करण्यात आला .यावेळी निवृत्त पोलीस उपाधीक्षक विजयकुमार परकाळे समता सैनिक दलाचे जि ओ सी समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर, निवृत्त पोलीस उपनिरीक्षक केरू जाधव ,शाखे संघाचे अध्यक्ष अंगद मुके, सिद्धनाथ ब्रिगेडचे प्रमुख नाईक जयानंद कांबळे ,यांच्या हस्ते सर्व उपस्थित सर्व सैनिकांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी समता सैनिक दलाचे महासचिव अनिल जगताप, प्राचार्य वरिष्ठ सोनकांबळे, चितरंजन सातपुते, विकी जाधव, । पान २ वर

## एक तास स्वच्छतेसाठी झटले लाखो हात ..! जिल्हाधिकारी यांनी उचलला कचरा!

### घराबरोबर अंगण व परिसर स्वच्छ ठेवा : जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद

सोलापूर/प्रतिनिधीः स्वच्छता ही सेवा मोहीम आद तालुक्यातील सर्व गावांमध्ये एक तारीख एक तास या मोहिमे खाली स्वच्छतेसाठी लाखो हात झटले.. हजारो टन कचरा गोळा करणे बरोबर आबाल वृध्द, अपंग या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते. दरम्यान आज जिल्हा परिषद आवार व मंदिर परिसरात घेणेत आलेल्या स्वच्छता मोहिमेत जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी स्वत हातात. झाडू घेऊन परिसर स्वच्छ केला तर हातात हॅन्डग्लोज घालून कचरा उचलला.



आपले घराबरोबर परिसर देखील स्वच्छ ठेवा असे आवाहन आज जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी जिल्हा वासियांना केला. स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ अंतर्गत स्वच्छता ही सेवा हा उपक्रम दिनांक १५ सप्टेंबर २०२३ ते ०२ ऑक्टोबर २०२३ या कालावधीमध्ये राबविण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार आज दिनांक ०१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० वा. या वेळेत जिल्हातील प्रत्येक तालुक्यामधील प्रत्येक गावात एक तास स्वच्छतेसाठी श्रमदान मोहीम राबविणेत आली.

जिल्हा स्तरावर घेणेत आलेले मोहिमेत जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे व पाणी व स्वच्छतेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, स्वच्छ भारत मिशन चे ब्रॅन्ड ॲम्बेसिडर सचिन खरात, शिक्षणाधिकारी प्रसाद मिरकले,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी .कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, अधिक्षक अनिल जगताप, कक्ष अधिकारी विवेक लिंगराज, कक्ष अधिकारी अविनाश गोडसे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, जिल्हा परिषदेतील युनियनचे डॉ. एस.पी माने,जहीर शेख, सचिन घोडके, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय बहुजन कर्मचारी संघटनेचे कोषाध्यक्ष संतोष जाधव, रणजित गव्हाणे,,सादिक शेख, राज उपासे ,वसंत काळे आदी कर्मचारी उपस्थित होते.

एक तास स्वच्छतेसाठी झटले लाखो हात .. !

या स्वच्छता मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन सिईओ मनिषा आव्हाळे यांनी केले होते. या आवाहनास जिल्हयात भरभरून प्रतिसाद मिळाला.

जिल्हात आज ११ तालुक्यातील १०१९ ग्रामपंचायती मधील ११४१ गावाच स्वच्छता मोहिम राबविणेत आली आहे. एक तास स्वच्छतेसाठी म्हणून आलेल्या ग्रामस्थांनी तसेच जिल्हा परिषदेचे सर्व विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी जोन तासा पेक्षा अधिक काम सुरू ठेवले.

अनेक ठिकाणी । पान २ वर




## ✻ सुविचार ✻

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
– स्वामी विवेकानंद

# संपादकीय

## रोजगाराच्या संधी...

सर्व माहिती इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर आणि त्याला सुरक्षा देणाऱ्या सॉफ्टवेअर ढगात ठेवून निश्चिंत व्हा, असे सांगणारे हे आभासी इलेक्ट्रॉनिक्स माहितीचे ढग जगभर लोकप्रिय नाही झाले तरच नवल. माहिती ढगांची सेवा ही इंटरनेट वापरत आपली साठवलेली माहिती सुरक्षितपणे परत मिळवता येते आणि हीच गोष्ट जनतेसाठी नावीन्यपूर्ण, क्रांतिकारी व झपाट्याने जगभर क्लाउड प्रसार प्रचार होण्यासाठी कारणीभूत ठरली. अगदी अल्प खर्चात नव्हे, तर खर्च बचत करीत इंटरनेटद्वारे आपला मोबाइल, टॅबलेट किंवा कॉम्प्युटरवरीलदेखील पाहिजे तेथून २४ बाय ७ बाय ३६५ असा आपला डेटा पाहता येतो असे हे अद्भुत इलेक्ट्रॉनिक्स 'माहिती ढग' म्हणजे 'क्लाउड कॉम्प्युटिंग'. नवीन तंत्रज्ञान आणि सेवांमुळे माहिती ढगांचे डायनॅमिक मार्केट वेगाने विकसित होत आहे. बिग डेटा, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), डेटा नालिटिक्स आणि मशीन लर्निंग (एमएल), सिक्स जी वेगवान इंटरनेट सेवा सारख्या ॲडव्हान्स टेक्नॉलॉजीमुळे क्लाउड कॉम्प्युटिंगला जागतिक मागणीचा महापूर आला आहे. आज ॲमेझॉन, जीमेल, फेसबुक, यूट्यूब, इन्स्टाग्राम आदींवर माहिती मिळविण्यासाठी आपण थेट 'क्लाउड'वरील साठविलेल्या माहितीशी सर्रास खेळत असतो याची अनेकांना कल्पना नसते. सॉफ्टवेअर, मोबाइल ॲप, सर्व्हर तसेच स्टोरेज स्पेस उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स 'माहिती ढगां'चे सुवर्णयुगात म्हणजेच 'क्लाउड कॉम्प्युटिंग' क्षेत्रात रोजगारसंधींचा 'पाऊस' पडतो आहे. आयटी म्हणजे माहिती तंत्रज्ञानाच्या वेगवान वाढीतला एक महत्त्वाचा शास्त्रीय टप्पा म्हणजे 'क्लाउड कॉम्प्युटिंग' होय. 'क्लाऊड कॉम्प्युटिंग' म्हणजे डेटा साठवून ठेवण्यासाठीची एक इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर प्लॅटफॉर्म असलेली सुरक्षित व मोठ्या हार्डडिस्कची जणू व्यवस्थाच. इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर आणि वायरलेस नेटवर्किंग याबाबत माहिती असणाऱ्या विद्यार्थ्यांचा जगभरातील कंपन्या पैसे देऊन शोध घेत आहेत हे विशेष. शिक्षण, आरोग्य, न्यायदान, प्रशासन एक ना दोन, 'क्लाउड कॉम्प्युटिंग'चा वापर होत नाही असे एकही क्षेत्र आता शिल्लक नाही.

# महार रेजिमेंटच्या शौर्याच्या गाथा




बाबासाहेबांच्या अनेक काळाच्या पुढच्या निर्णयामधील एक महत्वाचा निर्णय म्हणजे महार रेजिमेंट स्थापना.ब्रिटिशांच्या मार्शल नॉन मार्शल संकल्पनेला बाजूला सारत बाबासाहेबांच्या पुढाकाराने ०१ऑक्टोबर १९४१ ला महार रेजिमेंट स्थापना झाली.महार रेजिमेंटच्या शौर्याच्या गाथा ह्या जागतिक पातळीवरच्या आहेत.बर्मा पासून ते बलूचिस्तान फ्रंटियर पर्यंत महारांनी त्यांचा लढाऊ बाणा दाखवला आहे.महार रेजिमेंट बद्दल त्यांच्या अनेक युद्धामधील उत्कृष्ट कामगिरी बद्दल आपण अनेकदा वाचले आहे ऐकले आहे. पण महार रेजिमेंट बद्दल काही इंटरेस्टिंग गोष्टी आहेत ज्या बद्दल आजून बऱ्याच लोकांना माहिती नाही.

महार रेजिमेंटच्या महार रेजिमेंटच्या शौर्याच्या गाथा ऑल इंडिया ऑल क्लास सर्विस महार रेजिमेंट आधी बॅकवर्ड क्लास लोकांची देशभरातील मागासवर्गीय लोकांची रेजिमेंट होती पुढे जाऊन ती ऑल इंडिया ऑल क्लास सर्विस झाली.

जिथं जास्त रिस्क तिथं सुरवातीला महार रेजिमेंट मुळात जिथं जास्त रिस्क तिथं सुरवातीला महार रेजिमेंट ला डिप्लोय केल्याचे उदा.तुम्ही पाहू शकाल. महार रेजिमेंट नी युद्धाच्या मैदानात जशी दमदार कामगिरी केली तशी ह्या अतिशय डीसीप्लिन रेजिमेंट ने भारत-पाकिस्तान फाळणी दरम्यान महत्त्वाचे आणि तेवढेच संयमाचे काम केले ते म्हणजे -फाळणी काळात जो हाहाकार माजला त्यात इथून विस्थापित होणाऱ्या मुस्लिम लोकांना सुरक्षा देण्याचे काम महार रेजिमेंट ने केले. एवढेच नव्हे तर एक तुकडी पाकिस्तान मधे गेली होती व त्यांनी तिथून येणाऱ्या काही हिंदू-शीख समुदायाला सुखरूप आणण्याचे काम चोख बजावले होते. सेम थेअरी श्रीलंकेत महार रेजिमेंट बद्दल वापरली गेली नवीन प्रांत त्यावेळी आतासारखे कम्युनिकेशन साधन कमी तिथं सुद्धा महार रेजिमेंट ने आपली अद्वितीय कामगिरी केली. मशीनगन चालवणारी पहिली भारतीय रेजिमेंट म्हणून महार रेजिमेंटची इतिहासात नोंद

महार रेजिमेंट जेवढी शूर आहे तेवढीच ती क्विक लर्नर आहे. नवीन नवीन गोष्टी लवकर आत्मसाद करणे हा त्यांचा एक महत्त्वाचा गुण आहे.महार रेजिमेंटचा जुना लोगो पहिला तर त्यात MG ही दोन अक्षरं आपणाला दिसतील. ती दोन अक्षरं आहेत Machine Gun ऑटोमॅटिक मशीन गन चालवणारी पहिली भारतीय रेजिमेंट म्हणून महार रेजिमेंटची इतिहासात नोंद आहे.त्या गनला Vickers Gun असे सुद्धा म्हणले जाते. पारंपरिक युद्धतंत्र ज्यात मॅन्युली लोडेड बंदुका आणि ह्या विकर ऑटोमॅटिक गन खूप फरक आहे.ह्यात मॅकिनिझम आहे टेक्नॉलॉजी आहे.हे सगळं समजून घेऊन त्याला अतिशय कमी काळात युज टू होऊन अनेक युद्धात शत्रूला पाणी पाजण्याचे काम महार रेजिमेंट ने केले आहे.स्वातंत्र्य उत्तर काळात जेवढे मिलिटरी ऑपरेशन झाले त्या सगळ्या ऑपरेशन मधे महार रेजिमेंटचा सहभाग आहे. बाबासाहेबांनी ह्या अतिशय मेहनती,चिवट,शूर,देशप्रेमी लोकांना महार रेजिमेंटच्या रूपाने एक प्लॅटफॉर्म दिला आणि महार रेजिमेंट ने त्यांच्या कर्तृत्वाने/निर्भीड/निडर गुणाने हर एक युद्धभूमीवर विजयाचे झेंडे गाडलेत. आज महार रेजिमेंट दिवस आहे महार रेजिमेंट मधील सर्व अधिकारी/सैनिक/माजी सैनिक त्यांच्या कुटुंबियांना सॅल्युट.

**लेखक :सुशांत कांबळे**
**इतिहास अभ्यासक**
**सामाजिक कार्यकर्ते.**

पान १ वरुन

## एक तास स्वच्छतेसाठी झटले लाखो ..

पडत्या पावसात श्रमदान केले. सर्व गटविकास अधिकारी यांनी गेल्या तीन दिवसा पासून चांगले नियोजन केले होते. त्यामुळे स्वच्छता श्रमदानाचा मेसेज सर्व लोका पर्संत जाणेस मदत झाली.

पर्यटन स्थळाची स्वच्छता..!

सोलापूर शहारात सिध्देश्वर मंदिराकडे जाणारे अडुसष्ठ लिंग पैकी जिल्हा परिषद आवारात असलेले ठिकाणी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचे सह अधिकारी व कर्मचारी यांनी स्वच्छता केली. संत गाडगे बाबा की जय, स्वच्छ गाव सुंदर गाव, प्लास्टिक मुक्त गाव करा. ! स्वच्छ कार्यालय सुंदर कार्यालय या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. जिल्हा परिषद मुख्यालयातील विभाग प्रमुख व कर्मचारी यांनी छत्रपती शिवाजी उद्यान, रंगभवन ते जिल्हा परिषद मार्ग, कॉंग्रेस भवन समोरील अडुसष्ठ लिंग परिसराची स्वच्छता केली. प्लास्टिक, गुटख्याच्या पुड्या, कागद व पाला पाचोळा एकत्रित करणेत आला.

जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळांची देखील स्वच्छचा करणेत आली.

गावानजीक असलेले रेल्वे ट्रॅक आणि स्थानके आणि आजूबाजूचा परिसर, रस्त्याच्या कडेला, पाणवठे, घाट, झोपडपट्ट्या, पुलांखालील, बाजाराची ठिकाणे, बॅकलेन्स, प्रार्थनास्थळे, सार्वजनिक आणि खाजगी कार्यालयांच्या आजूबाजूचे क्षेत्र, पर्यटकांची ठिकाणे, बस स्टँड आणि टोल प्लाझा, वन्यजीव क्षेत्र, गोशाळा, टेकड्या, निवासी क्षेत्रे, आरोग्य संस्था आणि लगतचे क्षेत्र, अंगणवाड्यांभोवतीचे क्षेत्र, शाळा आणि महाविद्यालयांच्या आसपासचे क्षेत्राचे परिसरात ही स्वच्छता मोहिम घेणेत आली.

स्वच्छतेसाठी श्रमदान मोहिमेत सरपंच, ग्रामसेवक. ग्राम विकास अधिकारी, सर्व ग्रामपंचायत सदस्य, महिला बचत गट, युवक युवती मंडळे, शालेय विद्यार्थी, ग्रामस्तरीय अधिकारी, कर्मचारी बीआरसी व सीआरसी सहभागी झाले होते.

एक तास स्वच्छते साठी मिनिट टू मिनिट नियोजन ..!

विशेष मोहिमे साठी मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांचे मार्गदर्शना खाली अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर,उप मुख्य कार्यकारी इशाधिन शेळकंदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल जाधव यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, संवाद सल्लागार सचिन सोनवणे, मनुष्यबळ सल्लागार शंकर बंडगर, क्षमता बांधणी सल्लागार महादेव शिंदे, जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार दिपाली व्हटे, सनियंत्रण सल्लागार यशवंती धत्तुरे, वित्त व संपादणूक सल्लागार अर्चना कणकी, घनकचरा सल्लागार मुकूंद आकुडे, अल्फिया बिराजदार, यांचे सह सर्व विस्तार अधिकारी पंचायत, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी व सरपंच , सिंह. ग्राप चे कर्मचारी, बीआरसी , जलसुरक्षक व सीआरसी , उमेद, आरोग्य विभाग तसेच महिला व बाल कल्याण यांचे सह सर्व विभागाचे विभागाचे सर्व कर्मचारी या मोहिमे साठी प्रयत्न केले आहेत. .

## सोलापुरात जिल्ह्यात यशसिद्धी ..

अंकुश बनसोडे, बापू गायकवाड, महिला ब्रिगेडचे अध्यक्ष सुमित्रा जाधव ,भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष राजेश्री ताई गायकवाड, भारती महासभेचे जिल्हा उपाध्यक्ष मेजर कमलाकर कांबळे,प्रीपोवेल ,प्रज्वल ,डोळसे, शिवाजी ,भंडारे ,कांता ,सुरवसे, सुमन, गाडे, विक्रांत ,दुपारगुडे, शासकीय संघाचे अध्यक्ष अंगद मुके, निवृत्त पोलीस उपनिरीक्षक शेखर वाघमारे ,मिलिंद कोरे, गोपीनाथ कांबळे ,ईश्वर मसलक्कम ,अशोक सोनवणे ,के पी सुरवसे, नाना, गाडे, हजारे, अण्णा यांचा सह ५० निवृत्ती पोलीस अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

महार रेजिमेंटचे सत्कारमूर्ती सैनिक हा कॅप्टन कमलाकर कांबळे यांचा सत्कार समता सैनिक दलाचे जि ओ सी समाज भूषण अण्णासाहेब भालशंकर यांच्या हस्ते करण्यात आला. जयानंद कांबळे ,रामचंद्र माशाळे, भाऊसाहेब वंजारी, विद्याधर ढोणे, संगप्पा शिंदे, सूर्यकांत गजदाने ,गणेश कांबळे, चंद्रकांत बनसोडे, विष्णू वाघमारे, प्रमोद जाधव, सुरेश खरसुदे, शिवाजी गायकवाड ,शंभूदेव सुरवसे ,शिवाजी सुरवसे ,शहाजी देडे ,महेश गायकवाड ,गुंडू केंगार, मधुकर माने , हा कॅप्टन सत्यवान वाघमारे, सदाशिव पटत, राहुल साबळे, पंडित होनमाने ,सुरेश गेजगे,शूरवीरांचा सत्कार करण्यात आला. थोडक्यात महा रेजिमेंटचा इतिहास.

## मुंबईसह राज्यात मान्सूनची हजेरी!

कोसळणार आहेत.राज्यात गेल्या काही दिवसांपासून काही भागांत विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यांसह पावसाने हजेरी लावली आहे. कोकण किनारपट्टीला मुसळधार पावसाचा तडाखा बसला. सखल भागात पाणी साचल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यासोबतच मध्य महाराष्ट्रातही रिमझिम पाऊस पाहायला मिळाला. कोकण किनारपट्टी आणि गोव्यात आजही जोरदार पाऊस पाहायला मिळणार आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातही मुसळधार पावसाची शक्यता आहे.

मुंबईमध्ये आज ढगाळ वातावरण राहणार आहे. काही भागांत जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तर काही भागात पावसाची रिमझिम पाहायला मिळेल. रविवारी मुंबईत मुसळधार पावसाने हजेरी लावली. लालबाग, परळ भागात जोरदार पाऊस झाला. मुंबई उपनगरात ढगाळ वातावरण पाहायला मिळालं. ठाणे जिल्ह्यात रविवारी अधूनमधून पावसाची रिपरिम सुरु होती. आज ठाणे जिल्ह्यात काही भागात ढगाळ वातावरण पाहायला मिळेल. तसेच हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची ही शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, २ ऑक्टोबर रोजी, उत्तर ओडिशा, बिहार, झारखंड, सिक्कीम, उप-हिमालयीन पश्चिम बंगालमध्ये हलका ते मध्यम तर काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल. हवामान विभागाने ओडिसा, झारखंड राज्यांसाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. छत्तीसगड आज आणि उद्या पूर्व मध्य प्रदेशात आणि छत्तीसगडमध्ये हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तर, काही भागांत विजांच्या गडगडाट आणि वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज आहे. उत्तर छत्तीसगडमध्ये विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून तेलंगणात

किनारी भागांमध्ये चांगल्या प्रकारची दळणवळण यंत्रणा तयार करण्यासाठी पंतप्रधान मोदींनी राष्ट्रीय महामार्ग ३६५ इइ च्या ५९ किमी लांबीच्या सूर्यपेट ते खम्ममपर्यंतच्या चौपदरीकरणासाठी एका रस्ते प्रकल्पाची देखील घोषणा यावेळी केली. या प्रकल्पासाठी सुमारे २,४६० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. हा चौपदरीकरणाचा प्रकल्प हैदराबाद -विशाखापट्टणम कॉरिडॉरचा एक भाग आहे. जो भारतमाला परियोजनेअंतर्गत विकसित केला जात आहे.१३,५०० कोटींच्या विकासकामांचे उद्घाटन केल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मला आनंद आहे की मी आज अशा अनेक रस्ते कनेक्टिव्हीटी प्रकल्पांचे शिलान्यास आणि लोकार्पण केले आहे. ज्यामुळे येथील लोकांच्या जीवनात खूप मोठे बदल होणार आहेत. नागपूर-विजयवाडा कॉरिडॉरच्या माध्यमातून तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्रामध्ये दळणवळण खूप सोपे होणार आहे. या कॉरिडॉरमुळे या तीनही राज्यांमध्ये व्यापार, पर्यटन आणि गुंतवणुकीला चालना मिळणार आहे.

जक्लेर ते कृष्णा दरम्यान तयार करण्यात आलेला ३७ किमीचा रेल्वेमार्गाचे देखील उद्घाटन पंतप्रधान मोदींनी केले. नारायणपेट जिल्ह्यामध्ये चांगली दळणवण सुविधा तयार करण्यासाठी हा रेल्वेमार्ग ५०० कोटींपेक्षा जास्त खर्च करून बांधण्यात आला आहे. तसेच पंतप्रधान मोदींनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून कृष्णा स्टेशनवरून हैदराबाद (काचेगुडा) – रायचूर-हैदराबाद (काचेगुडा) रेल्वे सेवेला हिरवा झेंडा दाखवला. हैदराबाद (काचेगुडा)-रायचूर-हैदराबाद (काचेगुडा) रेल्वे तेलंगणा राज्यातील हैदराबाद, रंगारेड्डी, महबूबनगर आणि नारायणपेट जिल्ह्यांना कर्नाटकातील रायचूरशी जोडणार आहे. ही रेल्वे सेवा महबूबनगर आणि नारायणपेट जिल्ह्यातील अनेक भागांना पहिल्यांदाच रेल्वे कनेक्टिव्हीटी प्रदान करणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी रस्ते आणि रेल्वे प्रकल्पांसह सुमारे २,१७० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या हसन-चेरापल्ली डझ्रऋ पाइपलाइन प्रकल्पाचेही उद्घाटन केले. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड च्या कृष्णपट्टणम ते हैदराबाद या ४२५ किमीच्या पेट्रोलियम पाइपलाइनची पायाभरणी देखील पंतप्रधान मोदींनी यावेळी केली. या पाइपलाइनचा प्रकल्प सुमारे १,९४० कोटी रुपये खर्च करून तयार करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व प्रकल्पांसह हैदराबाद विद्यापीठाच्या पाच नवीन इमारतींचे देखील उदघाटन केले. स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, स्कूल ऑफ मॅथेमॅटिक्स ॲंड स्टॅटिस्टिक्स, स्कूल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, लेक्चर हॉल कॉम्प्लेक्स-खखख आणि सरोजिनी नायडू स्कूल ऑफ आर्ट्स ॲंड कम्युनिकेशन या नावाने पाच इमारती ओळखल्या जाणार आहेत.

## उजनीतील पाणीसाठा झपाट्याने

आहे. उजनी धरणाची एकूण क्षमता १२३ टीएमसी एवढी आहे. धरण शंभर टक्के भरण्यासाठी आणखी ४० टीएमसी पाणीसाठ्याची गरज आहे. प्राप्त परिस्थितीत धरणातील वाढलेला पाणीसाठा पाहता धरणातून शेतीसाठी पाण्याचे आवर्तन सोडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. रविवारी दुपारी उजनी धरणात दौंडमार्गे येणारा पाण्याचा विसर्ग २५ हजार ८५९ क्युसेक इतका होता. त्यात सायंकाळी नऊ हजार क्युसेकने वाढ होऊन ३४ हजार १५८ क्युसेक विसर्गाने पाणी धरणात मिसळत होते. पुण्यातील बंडगार्डन येथून नदीत येणा-या पाण्याचा विसर्ग वाढून १६ हजार १२३ क्युसेकपर्यंत गेल्यामुळे उद्या सोमवारी धरणात मिसळणारे पाणी सुमारे ४० हजार क्युसेकपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे.

## स्वच्छता कागदावर नको, प्रत्यक्ष

म्हणाले. राज्यात शहरी आणि ग्रामीण मिळून ७२ हजारांपेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छतेची ही मोहीम पार पडली असून त्याबद्धल मुख्यमंत्र्यांनी कौतूक केलं.

२ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यभर नागरिकांच्या श्रमदानानं स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. नगरविकास विभागाच्या वतीनं या मोहिमेचं आयोजन करण्यात आलं आहे. गिरगाव चौपाटी येथे शुभारंभासाठी पालकमंत्री दीपक केसरकर, मुख्य सचिव मनोज सौनिक, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. इक्बाल सिंह चहल, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव केएच गोविंद राज, ज्येष्ठ क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर, इस्रायलचे कौन्सिल जनरल श्री कोबी, कोस्टगार्ड महासंचालक कैलाश नेगी,अभिनेते नील नितीन मुकेश, पद्मिनी कोल्हापुरे, जुही चावला, सुबोध भावे हे सेलिब्रिटीही उपस्थित होते.

या ऐतिहासिक मोहिमेत सर्वांनी घेतलेल्या उत्स्फूर्त सहभागासाठी मुख्यमंत्र्यांनी आभार मानले. तसेच, मुख्यमंत्री म्हणाले की, पंतप्रधानांनी जेव्हा पहिल्यांदा लाल किल्ल्यावरून स्वच्छ भारताची घोषणा केली आणि स्वत: झाडू घेऊन रस्त्यावर उतरले, तेव्हा अनेकांनी त्यांच्यावर टीका केली आणि खिल्ली उडविण्याचा प्रयत्न केला, पण सगळी जनता जेव्हा या अभियानात उतरली आणि जो इतिहास त्यानंतर रचला तो सगळ्या जगानं पाहिला आणि टीकाकारांची तोंडं बंद झाली. पंतप्रधान म्हणतात त्याप्रमाणे, स्वच्छता हा काही केवळ एक दिवस आणि कुणीतरी एकानंच राबविण्याचा कार्यक्रम नाही, तर ती नेहमीसाठीची आपली जीवनशैली असली पाहिजे.

स्वच्छता हीच सेवा हे अभियान महत्त्वाचं आहे. ते कागदावर ठेवू नका. प्रत्यक्ष फिल्डवर काम दिसलं पाहिजे. आजचा दिवस झाला की संपलं, असं नाही. आज स्वच्छता आणि उद्या कचरा, असं होता कामा नये, असंही मुख्यमंत्री म्हणाले. स्वच्छतेत महाराष्ट्राला देशात अव्वल स्थान मिळवून देऊया, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याप्रसंगी केलं आहे.

राज्यातल्या गडकिल्ले, धार्मिक स्थळे, मंदिरं यांच्या परिसरात देखील स्वच्छता असली पाहिजे. ही तीर्थक्षेत्रे सुंदर दिसली पाहिजेत यासाठी देखील सर्वांनी सहभागी होऊन काम केलं पाहिजे, असंही मुख्यमंत्री म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे जगात भारताचा डंका वाजत आहे, असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, जे पन्नास साठ वर्षात जमलं नाही, ते पंतप्रधानांनी गेल्या आठ-नऊ वर्षांत केलं आणि देशात स्वच्छतेचं काम झालं, भ्रष्टाचाराची सफाई झाली.

दरम्यान, गिरगाव चौपाटीवर येताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सर्वात आधी ग्रीनलॉन्स स्कूलच्या विद्यार्थ्यांना भेटले. हे विद्यार्थी स्वच्छतेच्या मोहिमेत सहभागी होण्यासाठी आपल्या शिक्षकांच्या बरोबर आले होते. मुख्यमंत्र्यांनी सगळ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांचं कौतुक केलं. जोगेश्वरीच्या मर्कझ उल मारिफ एज्युकेशन अँड रिसर्च सेंटरचे विद्यार्थीसुद्धा स्वच्छता मोहीमेत सहभागी होण्यासाठी गिरगाव चौपाटीवर आले होते. मुख्यमंत्री त्यांच्याशी देखील बोलले. आज चौपाटी येथे स्वच्छता स्वयंसेवकांच्या जोडीनं अनेक संस्था देखील सहभागी झाल्या होत्या. याशिवाय नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, एनसीसी, गुरुनानक हायस्कूल, नवनीत कॉलेज, सागरी सीमा मंच, उत्कल सेवा समिती, नॅशनल हौसिंग बँक, सेंट झेव्हियर्स कॉलेज तसेच पोलीस, होमगार्ड्स, महानगरपलिका कर्मचारी यांनी उत्साहानं या मोहिमेत भाग घेतला.

## विश्वचषक मराठी, हिंदीसह ९

आठ प्रेजेंटर असतील. त्यासोबत इंग्लंडचा माजी खेळाडू केविन पीटरसन, दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार फॉफ डु प्लेसी व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून समालोचनासाठी सहभागी असतील. लिसा स्थळेकर, रमीज राजा, रवी शास्त्री, ॲरॉन फिंच, सुनील गावसकर आणि मॅथ्यू हेडन यांचा समावेश असेल. तसेच, इयान स्मिथ, नासिर हुसेन आणि इयान बिशप हे आयसीसी कॉमेंट्री बॉक्समध्ये दिसेल. शॉन पोलॉक, अंजुम चोप्रा आणि मायकल एथर्टन कॉमेंट्री बॉक्समध्ये दिसतील. सायमन डूल, म्पुमेलेलो मबांगवा, संजय मांजरेकर, केटी मार्टिन, दिनेश कार्तिक, डर्क नॅनेस, सॅम्युअल बद्री, अतहर अली खान आणि रसेल अर्नाल्डही कॉमेंट्री पॅनेलमध्ये असतील. समालोचक हर्षा भोगले, कास नायडू, नार्क निकोलस, नताली जर्मनोस, मार्क हॉवर्ड आणि इयान वॉर्ड यांसारखे दिग्गजही समालोचन करताना दिसतील.

## रस्त्याअभावी गर्भवती महिलेने वाटेतच दिला बालकाला जन्म

**एकीकडे चंद्रावर आपलं वर्चस्व स्थापित करण्याचा मानस.... तर दुसरीकडे खेड्या पाड्यात धड रस्ता नाही**



शहापूर/विजय घनघाव : शहापूर तालुक्यातील वेळूक ग्रामपंचायत मधील पटकीचापाडा येथील गर्भवती महिलेला प्रसूती साठी डोली करून कसारा (PHC) येथे दाखल करण्यासाठी गावकऱ्यांनी डोली करून आणयाचे होते ,

परंतु रस्त्या अभावी या गर्भवती महिलेची वाटेतच प्रसूती झाली त्यानंतर या महिलेला कसारा येथे दाखल करण्यात आले आहे.

२०१८ मध्ये रस्ता मंजूर झालेला असताना ठेकेदारा ने केवळ फलक लावल्याचे दिसून येतेय. मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत वेळूक ते पटकीचापाडा हा रस्ता अपूर्ण राहिल्याने येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अशा घटनांना नक्की जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित राहिल्या शिवाय राहणार नाहीच...

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## महमद पैगंबर जयंतीनिमित्त दुधनी मुस्लिम पंच कमिटी तर्फे साहित्य वाटप



अक्कलकोट/प्रतिनिधीः महमद पैगंबर यांच्या जयंती निमित्त दुधनी येथे मुस्लिम समाजाच्या वतीने दीनीमदरसा येथील मुलांना कुरान व कपडे वाटप पंचकमिटीचा वतीने करण्यात आली आहे.

याप्रसंगी मुस्लिम समाजाचे अध्यक्ष- जिलानी नाकेदर,उपाध्यक्ष-महीबूब गुलबर्गा,आधार स्तंभ- डॉ.नदाफ सर, रफीकसाब चौधरी ,महेदिमिंया जिडगे, सलीम मकांदार ,बाशा हाफिज ,मुनीर मानियार ,अबू बळूर्गी ,नाजिम बळुर्गी ,हसन हुसेन नदाफ ,अबू लोहार ,इमामशा मकांदार, हसन नदाफ ,अय्युब चौधरी ,हमीद बडेखां ,उस्मान शिकलगार, गौस शैखजी, इस्माईल गुलबर्गा, उमर मनियार, यासीन मनीयार, युनूस बडेखां, अरबाज पठाण,मोसिन मोमीन, समीर जिडगे, युसुफ बडेखां, महिबूब शेखजी,अय्युब बांगीअनवर , अमन अत्तार, अल्ताफ खैराट, सय्यद मकांदर, जमीर नदाफ, अशपाक मुजावर, अमिनोदिन मणियार, असलम खाटीक,आदि सहा नुरानी मस्जिद रेल्वे स्टे. दुधनी चे अध्यक्ष अन्वर बेण्णेसूर,उपाध्यक्ष रसूल मुकादम,सचिव हजार मुल्ला,सदस्य-हकीम चौधरी,हाजी नाकेदार,वसीम पटेल,इस्माईल नाकेदार,शारदा नाकेदार,सैय्यद मोटगी,महिबूब बिल्लाड,महमदशरीफ मोटगी,सद्धाम शेख व ईतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## तुळजापूरचे लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी केली नळदुर्ग शहरातल्या ऐतिहासिक किल्ला परिसराची स्वच्छता

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :संपूर्ण देशभर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या निमित्ताने ( १ ) आक्टोंबर रोजी पूर्ण देशभर गाव स्वच्छता मोहीम चालू असून ज्या शहरांमध्ये ऐतिहासिक स्थळे आहेत अशा ठिकाणी जाऊन स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे.स्वच्छता ही आपल्या जीवनातील खूप मोठा अविभाज्य घटक आहे गाव शहर स्वच्छ असेल तर या स्वच्छतेवरून आपली आपल्या गावची गुणवत्ता कळते सुंदर शहर सुंदर गाव ही संकल्पना पूर्ण देशभर चालू होते परंतु कचरा मुक्त भारत स्वच्छता हीच सेवा म्हणून संपूर्ण देशभर राष्ट्रीय स्तरावर स्वच्छतेचे कार्यक्रम राबवत आहेत प्रथमता लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील किल्याच्या गेटवर येताच यूनिटी मल्टीकॉन चे झठज विनायक अहंकारी यांनी आमदारचे स्वागत सत्कार केले .

हे अभियान नळदुर्ग शहरांतल्या ऐतिहासिक शहरात राबविण्यात आले यावेळी तुळजापूर तालुक्याचे कर्तव्यदक्ष व लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रमुख उपस्थित होते स्वच्छता अभियान राबविण्यात आले .राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या निमित्ताने अभियान राबवण्यात येत आहे सामाजिक भान ठेवून आपण एक पाऊल पुढे मार्गक्रमण करण्याची जास्त गरज आहे काळजी गरज आहे तिथे आरोग्य धोक्यात अशी परिस्थिती कोणावर येऊ नये म्हणून केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडून हे अभियान राबवले जात आहे नळदुर्ग च्या ऐतिहासिक किल्ल्यामध्ये हे अभियान राबवण्यात आले यावेळी भाजपचे नितीन काळे नळदुर्ग नगरीचे माजी नगराध्यक्ष उदय भाऊ जगदाळे माजी प्रभारी नगराध्यक्ष नय्यर जागीरदार माजी नगरसेवक संजय बताले भाजपाचे ॲड दीपक आलुरे भाजपाचे पद्माकर घोडके सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव भाजपाचे शहराध्यक्ष भिमाजी घुगे भाजपाचे निरंजन राठोड क्षमाबाई राठोड शिवसेनेचे संतोष पुराने भाजपचे सुशांत भूमकर नगरपरिषदेचे कर्तव्यदक्ष



मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार शिवसेनेचे कमलाकर चव्हाण यांच्यासोबत नगरपालिकेचे सर्व कर्मचारी सफाई कामगार कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष राठोड उप प्राचार्य ढोकळे प्रा डॉ उद्धव भाले प्रा सुतके प्रा डॉ पंडित गायकवाड आपलं घर येथील विद्यार्थिनी विद्यार्थी व तेथील सर्व शिक्षक नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे भगवंत सुरवसे लतीफ शेख शिवाजी नाईक आयुब शेख अमर बाळे दादासाहेब बनसोडे सुनील बनसोडे युनिटी मल्टीकॅनचे तथा माजी नगरसेवक विनायक अहंकारी आधी जणांच्या उपस्थितीमध्ये हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले यावेळी . या स्वच्छतेत अनेकानी सहभाग नोंदविला आहे .

## मिलिंद बापूराव काळे यांची नाशिक शहर अध्यक्षपदी निवड



नाशिकः रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष सरसेनानी मा.आनंदराज आंबेडकर साहेब व केंद्रीय उपाध्यक्ष काकासाहेब खंबाळकर यांची आज नाशिकरोड जिमखाना गोदावरी गेस्ट हाऊस येथे पत्रकार परिषद संपन्न झाली त्यात आमचे बंधु मिलिंद बापूराव काळे यांची नाशिक शहर अध्यक्ष पदी निवड करण्यात आली याप्रसंगी राजाभाऊ गांगुर्डे,शंकरराव नेटावणे, बबनराव जगताप,सुनिल निकम,रघुनाथ केदारे,सुर्यकांत अभंग,मिलिंद पगारे,गौतम पगारे,शैलेश बागुल,दशरथ कडाळे,सुमीत जाधव,विशाल दोंदे,संदिप मोरे,राहूल पगारे,बाळासाहेब भालेराव, नितीन काळे,करण काबळे, रोहित बर्वे, संदिप काळे, लकी काळे,बाळा धिवर,अभिषेक बर्वे उपस्थित होते.

## अखिल भारतीय मराठा महासंघाची वार्षिक सभा व मेळावा शिर्डी येथे संपन्न

शिर्डी : ओबीसी समाजातील काही अविवेकी नेत्यांच्या वक्तयव्यामुळे मराठा अन इतर समाजात तेढ निर्माण होत असून मराठा कुणबी आरक्षणास विरोध करणे घटना बाह्य आहे असे परखड मत अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीयध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांनी व्यक्त केले. अखिल भारतीय मराठा महासंघाची वार्षिक सभा व मेळावा शिर्डी येथे संपन्न झाला. अखिल भारतीय मराठा महासंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा, युवा उद्योजक, शेतकरी व विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शन मेळाव्याचे शिर्डी येथे करण्यात आले त्यावेळी श्री. कोंढरे अध्यक्षपदावरून बोलत होते.

राष्ट्रीय सरचिटणीस प्रकाश देशमुख, उपाध्यक्ष विनायक पवार, वसंतराव मुळीक, राष्ट्रीय खजिनदार प्रमोद जाधव, राष्ट्रीय चिटणीस गुलाब गायकवाड, युवा प्रतिनिधी आतिष गायकवाड, अमोल निकम, उत्तर महाराष्ट्र संघटक लालूशेठ दळवी, नाशिक जिल्हाध्यक्ष चंद्रकात बनकर, नाशिक महिला अध्यक्ष अस्मिता देशमाने, धाराशिव महिला अध्यक्ष रेखा लोमटे, युवक सरचिटणीस योगेश पाटील, मंगेश निकम, किशोर गिराम, अमोल पवार आदी उपस्थित होते.

भारतीय राज्यघटनेच्या आधारे निर्माण झालेला आरक्षण कायदा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या इंद्रा सहानी खटल्याच्या आधारे निर्माण झालेला राज्य मागासवर्ग आयोगाच्या तरतुदी च्या आधारे आरक्षण धोरण राबविले जाते. या दोन्ही तरतुदीच्या आधार न घेता ज्यांनी ओबीसीतील अतिरिक्त आरक्षण अगोदरच बेकायदेशीर व्यापलेले आहे त्यानी मराठा समाजाच्या आरक्षणास व कुणबी प्रमाणपत्रास विरोध करणे ही भुमिका घटनाबाह्य व कायद्याचा अवमान करणारी आहे. दोन्ही समाज घटकांनी सामंजस्याची भूमिका घेणे गरजेचे आहे समाजा समाजात तेढ निर्माण करणे योग्य नाही सोशल मीडियावरील अविवेकी तेढ वाढवणाऱ्या पोस्ट टाळल्या पाहिजेत. हे त्यांना स्पष्टपणे सांगण्याची गरज




आहे त्यामुळे सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न कसा सोडवणार आहे रोडमॅप जाहीर करावा. मराठा समाजाला यापुढे ज्ञानाची आस गुणवत्तेचा विकास व्यावसायिकतेचा ध्यास या तीन सूत्रावर आधारित क्रियाशील व्हावे लागेल

एके काळी ग्रामीण अर्थव्यवस्थेत ३० ते ५०% % वाटा व स्थान असलेल्या मराठा समाजाला आज राज्याच्या आर्थिक व्यवस्थेत ३% पर्यंत खाली येण्याची कारणे शोधून त्यावर ते स्थान पुन्हा मिळविण्यासाथी काम करावे लागेल

राज्याच्या विकासात प्रकल्पासाठी कवडीमोल दराने जमिनी घेतल्या इथला इतिहास घडवताना देशाचे संरक्षण करताना ज्या समाजाने त्याग केला आरक्षणाचे धोरण ज्यांनी निर्माण केले त्या समाजातील दुर्बलांच्या साठी सर्व समाजाने उभे राहणे गरजेचे आहे.मागील सभेचे प्रोसडींग संयुक्त चिटणीस गुलाब गायकवाड यांनी वाचले. जमा खर्च, हिशोबा चे वाचन सरचिटणीस प्रकाश देशमुख यांनी वाचन केले. यावेळी अनेक सभासदांनी सूचना व ठराव मांडले. सूत्रसंचालन प्रमोद जाधव यांनी तर आभार अतिष गायकवाड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीते साठी उत्तर नगर जिल्हाध्यक्ष प्रकाश निर्मळ, दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवाजी डौले, सरचिटणीस रमेश बोरूडे, जिल्हा सरचिटणीस भाऊसाहेब वाकचौरे, राहुरी तालुकाध्यक्ष दिनकर पवार, संगमनेर तालुकाध्यक्ष भाऊसाहेब वराळ, अकोले तालुकाध्यक्ष भानुदास गायकर, कोपरगाव तालुकाध्यक्ष ऋषिकेश पवार, श्रीरामपूर तालुकाध्यक्ष सुजित ढोकचौले, राहता तालुकाध्यक्ष रवीराज देसले,विलास वराळ, योगेश निकम, अनिकेत सदाफळ, सुमित निर्मल, अपासाहेब ढोकणे, ऋषिकेश भोसले, बापूसाहेब तनपुरे, विकी गायकवाड, सचिन मुजगुले, निलेश शेजवळ, बंटी नेरपगारे आदींसह जिल्ह्यातील पदाधिकार्यांनी केले आहे.

## रिपब्लिकन पक्षाच्या वर्धापन दिनाच्या मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : अविनाश मडिखांबे



अक्कलकोट/प्रतिनिधीः रिपब्लिकन पक्ष(आठवले)च्या ६७व्या वर्धापनदिन सोहळ्यासाठी हैद्राबाद येथे कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हाहन रिपाइं अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी केली आहे. अक्कलकोट येथे भक्त निवास येथील रिपाइं(आठवले गट) चे बैठकीत बोलतांना अविनाश मडिखांबे म्हणाले की, रिपब्लिकन पार्टी आफ इंडियाचे.राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे सामाजिक न्याय राज्यमंत्री संघर्ष नायक मा.ना. डां.रामदासजी आठवले यांच्या देशात रिपब्लिकन पक्ष बळकट करण्याचा अविरत प्रयत्न करुन बाबासाहेबांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष उभा करण्याचा दूरदृष्टी ठेवून आणी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद येथे होणारा वर्धापनदिन सोहळा हा पक्षाच्या अस्थीत्वाचा प्रश्न आहे.तरी संपूर्ण अक्कलकोट तालुक्यातील कार्यकर्ते आवर्जून उपस्थित राहाण्याचे आग्रहाचे आव्हाहन त्यांनी यावेळी केली आहे. अक्कलकोट शहर व तालुक्यातील प्रत्येक समाजातील माणसापर्यंत पक्षाची ध्येय धोरणा पोचवण्याच प्रयत्न करण्याचा ग्वाही यावेळी मडिखांबे बैठकीत व्यक्त केली आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)च्या या बहुजन भीम यात्रा हैद्राबाद वर्धापन सोहळ्यानंतर केली जाईल. या बहुजन भीमयात्रेत जिल्हा उपाध्यक्ष सोपान गायकवाड,जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी,तालुका युवक अध्यक्ष अप्पा भालेराव,शहर अध्यक्ष अजय मुकणार,तालुका सरचिटणीस राजु भगळे,सूरजभाइ सोनके, तालुका कार्यध्यक्ष राजाभाई बोरगाव, अंबादास गायकवाड,मु आ शहर अध्यक्ष सैपन शेख,ता उपाध्यक्ष इस्माईल आळंद,शुभम मडिखांबे, महेदिमिंया जिडगे आदि सहा इतर पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे अविनाश मडिखांबे यांनी यावेळी सांगीतले आहे.यावेळी राहुल रुही यांनी प्रास्ताविक केली,शहर अध्यक्ष, राहुल रुही,जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी,राजु भगळे, अध्यक्षीय भाषणे अविनाश मडिखांबे यांच्या समयोचित भाषणे झली शेवटी तम्मा उर्फ लक्ष्मीकांत दसाडे यांनी आभार मानले.

सदर बैठकीत,जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी,उपाध्यक्ष सोपान गायकवाड,ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे,युवक ता अध्यक्ष अप्पा भालेराव,अजय मुकणार, अंबादास गायकवाड,राहुल रुही,राजु भगळे,रमेश धोडमनी,इस्माईल आळंद,गोरखनाथ धोडमनी,महेदिमिंया जिडगे,सागर बनसोडे,सचिन बनसोडे,कल्लाप्पाण्णा चव्हाण,लक्ष्मीकांत दसाडे,सैपन शेख,अंबादास शिंगे,अनिल दसाडे,विदेशी म्हेत्रे आदी सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वागदरीत एक तास स्वच्छतेसाठी अभियान संपन्न

वागदरी/ एस.के.गायकवाड : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून देशपातळीवर दि.१ ऑक्टोबर २०२३ रोजी राबविण्यात येणाऱ्या एक तास स्वच्छतेसाठी या आभियाना अंतर्गत वागदरी ता.तुळजापूर येते एक तास स्वच्छतेसाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

मौजे वागदरीच्या विद्यामान सरपंच सौ.तेजाबाई शिवाजी मिटकर यांच्या अध्यक्षतेखाली तर जेष्ट कार्यकर्ते सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी मीटकर गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी १०.०० वा.येथील ग्रा. प.कार्यालयाच्या प्रांगणात एक तास स्वच्छतेसाठी या




उपक्रमास सुरुवात करण्यात आली.या प्रसंगी येथील हणूमान मंदिर परिसरात व जि.प.प्राथमिक शाळेच्या परिसरात स्वच्छता करण्यात आली.

या एक तास स्वच्छता आभियानात सरपंच तेजाबाई मिटकर, ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्वर पाटील,अमोल पवार,अंकुल वाघमारे,सुरेखा यादव,सिआरपी विद्या बिराजदार,भाजपा मेडिया सेलचे तालुका अध्यक्ष किशोर धुमाळ, तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष राजकुमार पवार, उपाध्यक्ष मदन पाटील, उद्योगजक प्रकाश सुरवसे रिपाइं (आठवले )चे जिल्हा समन्वयक एस.के.गायकवाड, सामाजक कार्यकर्ते विलास बिराजदार, भालचंद्र यादव,दत्ता सुरवसे, ईस्माइल शेख,शाळेच्या मुख्याध्यापिका महादेवी जत्ते, सहशिक्षिका आरती साखरे,मनिषा चौधरी, सहशिक्षक तानाजी लोहार, शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष रामसिंग परिहार अंगणवाडीच्या पद्मीनीबाई पवार, रुपाली जाधव,आशा कार्यकर्ती पार्वतीबाई बिराजदार सह गावातील प्रतिष्ठित नागरिक महिला,विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## एक तास श्रमदान जि.प.मराठी शाळेने राबविला उपक्रम

वागदरी : जि .प .प्राथमिक मराठी शाळा वागदरी ता .अक्कलकोट जि .सोलापूर या शाळेत स्वच्छता पंधरवडा विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला .मेरी मिट्टी मेरा देश हा उपक्रम शाळेत स्वच्छतेची शपथ घेऊन आपला परिसर शाळा स्वच्छता करण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले .रांगोळी चित्रकला या स्पर्धा घेतल्या एक तारीख एक तास श्रमदान हा उपक्रम शालेय शिक्षण विभाग .भारत सरकार यांनी निर्देशित केलेनुसार सम्पूर्ण भारतात स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येत आहे .या उपक्रमाचा एक भाग म्हणून एक तारीख एक तास श्रमदान हा उपक्रम राबविण्यात येत आहे .हा उपक्रम जि .प .मराठी शाळेत मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे यांच्या नियोजन व मार्गदर्शनाखाली एक तास श्रमदान हा उपक्रम घेण्यात आला .श्रमदान करणे त्याचे महत्व समजून घेणे अन त्याप्रकारे काम करणे म्हणजेच स्वच्छता पंधरवडा पार पाडल्याचा आनंद आपल्या सर्वांना मिळेल .या राष्ट्रीय कार्यात सर्व जनतेचा सहभाग असावा .तुम्ही मुलांनी आपापल्या घरी तुमच्या पालकांना शेजाऱ्यांना सांगून स्वतः



.बरोबर त्यांनाही स्वच्छता करायला भाग पाडा .एक भारत स्वच्छ भारत या उपक्रमाचा आपण भाग होऊ .अशी माहिती रेखा सोनकवडे यांनी दिली .

एक तास श्रमदान हा उपक्रम घेण्यासाठी विद्यार्थी व शिक्षकांनी शाळा .परिसर रस्ता इत्यादी भागात स्वच्छता करून श्रमदान केले .आज आपला एक तास श्रम करण्यासाठी देऊन देशाविषयी असलेले कर्तव्य पार पाडले .मुलांचा खेळण्याचा व मौजमस्तीचा दिवस असतानाही शाळेत येऊन श्रमदान केले .अनुसया कलशेट्टी मनिषा कुणाले अर्चना गिरी यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे स्वच्छता पंधरवड्यात घेतलेल्या उपक्रमाची माहिती देऊन एक तास श्रमदान महत्व सांगितले व श्रमदान करून घेतले .कोरडा कचरा गोळा करून जाळण्यात आला व ओला कचरा जमा करून ठेवला .परिसर व रस्ता झाडुन काढला .यावेळी वागदरी केंद्राचे केंद्रप्रमुख बसवराज मुणोली होते .अनेकांनी मुलांचे कौतुक केले .प्रभावी उपक्रमा ची अंमलबजावणी करून श्रमदान करून हात स्वच्छ धुवा अन घरी जा अशाच प्रकारे आपल्या परिसराची स्वच्छता इतरांना सांगून करून घ्या असे रेखा सोनकवडे यांनी सांगितले व शिक्षक व विद्यार्थी यांचे आभार मानले .आंगणवाडी सेविका मदतनीस यांनी पण हा उपक्रम प्रभावी राबविला .

# स्वच्छतेसाठी ‘एक तारीख एक तास’ उपक्रमात पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे श्रमदान

## स्वच्छ्ता ही लोकचळवळ झाल्याचे प्रतिपादन

पुणे : स्वच्छ्ता हीच सेवा या अभियानांतर्गत स्वच्छतेसाठी 'एक तारीख एक तास' या उपक्रमात पुणे महानगरपालिकेच्यावतीने आयोजित वॉकेथॉनमध्ये सहभागी होऊन



पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी हाती झाडू घेत श्रमदान केले. स्वच्छ्ता ही लोकचळवळ झाली असून स्वच्छतेबाबतची आपल्या देशाविषयीची प्रतिमा बदलत आहे, असे प्रतिपादन मंत्री श्री. पाटील यांनी केले.

यावेळी पुणे महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त संदीप कदम यांच्यासह महानगरपालिकेचे विविध विभागप्रमुख उपस्थित होते.यावेळी पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे अनेक विषयामध्ये सर्वसामान्य नागरिकांना जोडून घेत त्याची लोकचळवळ निर्माण करण्यात यशस्वी झाले आहेत. गेल्या साडेनऊ वर्षात सर्वसामान्यांना स्वच्छ्ता मोहिमेशी जोडत आपल्या देशाची स्वच्छतेबाबतची प्रतिमा बदलली आहे.

आज शहरात साडेतीनशे पेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छतेसाठी उपक्रम राबविण्यात आला. यात दीड लाखाहून अधिक लोक सहभागी झाले आहेत हे या अभियानाचे यश आहे. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, विविध संस्था, कारखाने, स्वयंसेवी संस्था यात सहभागी झाले असून लोकसहभागाचे मोठे यश अभियानाला लाभले आहे. यातूनच स्वच्छतेची सवय निर्माण होण्यास मदत होते, असेही ते म्हणाले.

स्वच्छता हीच सेवा' उपक्रमाअंतर्गत पुणे महापालिकेच्या वतीने आयोजित वॉकेथॉनमध्ये महापालिका परिसर, शनिवार वाडा, भिडे पूल आदी ठिकाणी पालकमंत्री यांनी सर्वांसोबत सहभागी होत स्वच्छता केली. यावेळी त्यांनी उपस्थितांना स्वच्छ्ता विषयक शपथ दिली तसेच स्वच्छ्ता कर्मचाऱ्यांशीही संवाद साधला.



# काजळांबा येथील स्काऊट गाईड पथकाने राबविला एक तारीख एक तास श्रमदान


वाशीम : येथून जवळच असलेल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा काजळांबा येथे आज दिनांक १ऑक्टोबर रोजी शासनाच्या स्वच्छता ही सेवा या उपक्रमांतर्गत शाळेचे कार्यालय व परिसराची एक तारीख एक तास श्रमदान करून स्वच्छता करण्यात आली.राज्य शासनाने यावर्षी दिनांक १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२३ पर्यंत स्वच्छता पंधरवडा ही मोहीम राबविण्याचे ठरविले आहे.त्या अनुषंगाने आज स्काऊट मास्टर विनोद राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे राष्ट्रमाता जिजाऊ गाईड पथक, छत्रपती शिवाजी महाराज स्काऊट पथकातील विद्यार्थ्यांनी प्रथमतः महात्मा गांधी व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमा चे पूजन करून अभिवादन केले. त्यानंतर शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक रामदास मापारी, पदवीधर शिक्षक मधुकर महाले, सहाय्यक शिक्षक मदन इंगळे, यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन इंगळे ,उपाध्यक्ष बालाजी उगले, राष्ट्रमाता जिजाऊ गाईड पथकाची संघनायिका कुमारी आचल उगले, उपसंघनायिका कुमारी सृष्टी उगले तसेच छत्रपत

# कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडूरंग साखर कारखान्याकडून जिल्ह्यात सर्वाधिक दर : परिचारक

पंढरपूर/प्रतिनिधी : देशातील साखर कारखाने अडचणीत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साखर कारखान्याला इथेनॉल निर्मिती करण्याची सूचना केली यामुळे कारखान्यांना संजीवनी मिळाली आहे पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने जिल्ह्यात सर्वाधिक दर २७५१ एफ आर पी दिली असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी दिली.

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना ३२ व्या वार्षिक वार्षिक सर्वसाधारण सभेत परिचारक बोलत होते यावेळी कारखान्याचे संचालक अधिकारी शेतकरी सभासद उपस्थित होते यावेळी कार्यकारी संचालक यशवंत कुलकर्णी यांनी विषय पत्रिकेचे विषय मांडले आणि सभासदांनी एकमताने मंजुरी केली वाढ आणि वजन वाढ झालेली नाही त्यावेळी उसाची टंचाई दहा लाख टनापर्यंत गाळप होण्याची शक्यता आहे सभासदांनी इतर ठिकाणी ऊस न देता आपल्या कारखान्यालाच ऊस देऊन सहकार्य करावे असे आव्हान चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी केले.

दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असल्याने पेट्रोलचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी यांच्या आघातच पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्यात निर्णय घेण्यात आला आहे यासाठी



साखर कारखान्यांना इथेनॉल तयार करण्याचे सूचना केली आहे केंद्र सरकारने ६५ रुपये लिटर दराने इथेनॉल खरेदी केलेली आहे यातून साखर कारखान्यात मोठा फायदा झाला आहे नव संजीवनी मिळाले असल्याचे परिचारक यांनी सांगितले पांडुरंग साखर कारखाना शेतकऱ्याप्रमाणेच कामगारांकडेही लक्ष देत आहे शेतकऱ्यांना जादा दर देण्यासाठी प्रयत्न केला जात आहे पांडुरंग ने जिल्ह्यात सर्वाधिक दर २७५१ एफ आर पी दिली आहे त्यामुळे शेतकऱ्याकडून समाधान व्यक्त होत आहे कारखान्यासह वीज निर्मिती प्रकल्प व इथेनॉल पासून सुमारे १६० कोटी रुपये च्या उत्पन्न मिळाले आहे टॉप कारखान्यांमध्ये पांडुरंग कारखान्याचे नाव आहे यंदाच्या हंगामात कारखाना दररोज दहा हजार मेट्रिक टन गाळप करणार आहे तू कायम राहण्यासाठी सभासदांनी कारखान्याला ऊस देऊन सहकार्य करावे असे कारखाने चेअरमन प्रशांतराव केले आहे

# उज्वल भारत देशाच्या परिवर्तनशील प्रथमेश साठी स्वच्छतेचा जागर अभियान गरजेचे : सोमनाथ आवताडे



पंढरपूर/प्रतिनिधी : उज्वल भारत देशाच्या सर्वांगीण परिवर्तनशील काँग्रेसचे कोरम पूर्ण करण्यासाठी पूर्ण करून नवभारत चे स्वप्न साकार करण्यासाठी स्वच्छतेचा जागर हे अभियान नितांत गरजेचे असल्याचे प्रतिपादन पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे युवक नेते माजी सभापती सोमनाथ अवताडे यांनी व्यक्त केले आहे स्वच्छता पंधरवडा व स्वच्छता ही सेवा या अभियानात एक तारीख एक तास या अनोख्या उपक्रमाने अवताडे यांनी स्थानिक नागरिकांसोबत व मान्यवर मंडळीच्या उपस्थितीमध्ये पंढरपूर शहरातील स्वच्छता करून सदर मोहिमेमध्ये सहभाग नोंदवला याप्रसंगी उपस्थितीत संबंधित करताना ते बोलत होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभरामध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छतेसाठी श्रमदान करून आपला गाव व शहर व परिसर सुजलाम सुफलाम करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे स्वच्छता ही सवय आहे आपल्याला स्वच्छ शिस्त अंगी करायचे आहे त्याला संस्काराचे रूप द्यायचे आहे आरोग्य आणि समृद्धीला गवसणी घालणाऱ्या स्वच्छतेचा जागर अधिक व्यापक पद्धतीने आत्मसात करण्यासाठी एक तारीख एक तास हे अभियान यशस्वी करण्याचे आव्हान अवताडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. या अभियाना प्रसंगी पंढरपूर अर्बन मर्चंट बँकेचे चेअरमन नागेश काका भोसले माजी नगरसेवक लक्ष्मण तात्या शिरसाट डी राज सर्व गोड माझी उपनगराध्यक्ष अनिल अभंगराव सर सुरेश खिस्ते आबासाहेब पाटील बाधन सिंह ठाकूर नितीन कारंडे करता त्या जगताप राहुल गावडे प्रवीण पिसाळ उपमुख्य अधिकारी सुनील वाळूजकर यांच्यासह नगरपालिकेचे सर्व अधिकारी विविध सामाजिक संस्था अधिकारी पदाधिकारी महिला स्वयंसेवक भगिनी आणि नागरिक इत्यादी उपस्थित होते

# सुंदर गोविंद वाणी मित्र मंडळ वतीने घरगुती गणपती सजावट स्पर्धा निकाल जाहीर

नाशिक : सुंदर गोविंद वाणी मित्र मंडळ तर्फे घरगुती गणपती सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेला गणेशभक्तांनी उदंड प्रतिसाद दिला.परिसरातील ३० स्पर्धकांनी यांमध्ये सहभाग नोंदवला.

वैविध्यपूर्ण कल्पनेने साकारलेले तसेच आकर्षक आरास व पर्यावरणास समर्पित करणारे देखावे थक्क करणारे होते. गणेश भक्तांचा उत्साह व गणेशाप्रति अपार श्रद्धा यातुन दिसुन आली. या स्पर्धेचा निकाल आज जाहीर करण्यास आम्हांस अतिशय आनंद होतो आहे.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : १. प्रथम क्रमांक रुपये ३१००/- प्रदिप पी.तलवारे गोविंद नगर. २.द्वितीय क्रमांक रुपये २१००/- मधुकर गोविंद वाणी उंटवाडी. ३.तृतीय क्रमांक रुपये ११००/- हर्षल नकुल येवला ईच्छामणी कॉलनी.खोडे मळा. ४.चतुर्थ क्रमांक रुपये ११००/- योगेश जगन्नाथ फुलदेवरे रामल्या सृष्टी, कर्मयोगी नगर. ५.पाचवा क्रमांक रुपये ११००/-अनंत मधुकर धामणे गोविंद नगर. सर्व विजयी स्पर्धकांचे तसेच सर्व सहभागी स्पर्धकांचे सुंदर गोविंद वाणी मित्र मंडळाकडून



मनःपूर्वक आभार मानण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मंडळाचे सचिव संदीप देव उपाध्यक्ष शांताराम भदान अध्यक्ष निंबा अमृतकर खजिनदार रवींद्र सोनजे, पाटकर तात्या, सचिन राणे यांनी अथक परिश्रम घेतले

# भीमा नदीवरील बंधाऱ्याला दरवाजे टाकून पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करावा पालकमंत्री यांच्याकडील मागणीला यश : प्रशांत परिचारक

पंढरपूर/प्रतिनिधीः भीमा नदी मध्ये सध्या उजनी धरणातून सोलापूर शहराला पिण्यासाठी पाणी सोडण्यात आलेले आहे हे पाणी पुढील काळात उपलब्धतेसाठी भीमा नदीतील बंधाऱ्याला दरवाजे टाकून पूर्ण क्षमतेने पाणीसाठा



करावा जेणेकरून पुढील काळात पिण्याचा पाणीपुरवठा सुरळीत सुरे राहील याबाबत तात्काळ निर्णय वा वा अशी आगरी मागणी मा प्रशांत परिचारक यांनी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री व महसूल मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पत्राद्वारे केली होती त्याबाबत पालकमंत्री महोदयांनी सकारात्मक निर्णय घेत भीमा नदीवरील सर्व बंधारे पूर्ण क्षमतेने भरून घ्यावेत असे आदेश दिले

पंढरपूर मंगळवेढा सांगोला शहराचा पिण्याचा पाण्याचा पुरवठा भीमा नदीवर अवलंबून आहेत मागील काही दिवसापासून पंढरपूर शहर व ग्रामीण भागातील पिण्याचा पाणीपुरवठा एक ते दोन दिवसात करण्यात आला होता

त्यामुळे भीमा नदीवर अवलंबून आहेत मागील काही दिवसापासून शहर व ग्रामीण भागातील पिण्याचा पाणीपुरवठा एक दोन दिवसात करण्यात आला होता त्यामुळे जनता हैरान झाली होती उजनी धरणातून भीमा नदीमध्ये सोलापूर पंढरपूर शहराला पिण्यासाठी तसेच भीमा नदीच्या पाण्यावरती अवलंबून असणारे गाव गावांच्या नळ पाणीपुरवठा योजनेसाठी पाणी सोडण्यात आले आहे

जिल्ह्यात भीमा नदीच्या पात्रावर कुरुक्षेत्र द्राक्ष डाळिंब वर इत्यादी फळबागांसाठी शेती अवलंबून असल्याने या भागात समाधानकारक पाऊस नसल्याने ऊस उत्पादक शेतकरी व सामान्य शेतकरी अडचणीत आला आहे आणि पावसाळ्यात पाण्याअभावी पिकांची कोरफळ होत आहे त्यामुळे भीमा नदीवरील सर्व बंधारे पूर्ण क्षमतेने व दरवाजे टाकून भरून घ्यावे अशी मागणी पालकमंत्री महोदयांनी यांच्याकडे केली होती त्याच पालकमंत्री महोदयांनी तातडीने आदेश दिल्याने सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांमध्ये समाजाचे समाधानाचे वातावरण आहे

# मिना म्हसे यांच्या औषधी वनस्पती पुस्तकाला पुरस्कार

पुणे : मराठी अध्यापक संघ, पुणे शहर यांच्या वतीने साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दिला जाणारा उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार औषधी वनस्पती पुस्तकाच्या संपादिका व शिष्यवृत्ती तज्ञ शिक्षिका मिना म्हसे यांना सहकुटुंब महाराष्ट्रातील प्रसिद्ध विनोदी लेखक व दै. सकाळचे उपसंपादक



माननीय सु.ल. खुटवड यांच्या हस्ते व आमदार रवींद्र धंगेकर यांच्या उपस्थितीत सकाळी दहा वाजता पुणे येथील गंज पेठ, मधील सावित्रीबाई फुले सभागृहात आयोजित केलेल्या भव्य कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.मराठी अध्यापक संघाने मिना म्हसे यांच्यासह राज्यभरातील एकूण ७५ साहित्यिक- शिक्षकांचा सत्कार केला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध विनोदी लेखक व दै. सकाळचे उपसंपादक माननीय सु.ल. खुटवड यांच्यासह आमदार रवींद्र धंगेकर, पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष नंदकुमार सागर, मायमराठी राज्य अध्यापक संघाचे अध्यक्ष व ज्येष्ठ कवी लक्ष्मण महाडीक, लक्ष्मणराव आपटे प्रशालेच्या प्राचार्य मेधा सिन्नरकर, अध्यापक संघाच्या अध्यक्षा कल्पना शेरे आदी मान्यवर उपस्थित होते. हलगी आणि ढोल- ताशाच्या गजरातील स्वागत, विविध किस्से, शेरो- शायरी, विडंबन गीते, हशा आणि टाळ्यांचा गजर, मान्यवरांनी मारलेल्या शालजोडीतील कोपरखळ्या आणि याचबरोबर हृद्य सत्काराने भारावून गेलेले शिक्षक असा मिलाफ या कार्यक्रमात झाला होता.

# नांदुर्डी परिसरात डीपी ची दुरावस्था तर पोल पडण्या स्थितीत

निफाड : निफाड तालुक्यातील नांदुर्डी शिवारात वाकलेले पोल लोंबकळणाऱ्या तारा . ट्रान्सफॉर्मर ची झालेली दुरावस्था अन् स्थानिक नसणारा वायरमन यामुळे वीजपुरवठा खंडित झाला तर तो कित्येक तास सुरू होत नाही .वीज



बिल थकित झाल्यावर वीजपुरवठा कट करण्यासाठी जी तत्परता दाखविली जाते तशीच तत्परता वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी का दाखविली जात नाही. यावर्षी पावसाने पाठ फिरविल्याने शेतात उभी असलेली पिके जगविण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रीचा दिवस करून पिकांना पाणी द्यावे लागले .त्यातच विहिरींनी देखील तळ गाठल्याने आणि पाऊस पडण्याची आशा देखील मावळत चालल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत .त्यामुळे विहिरीला थोडेफार पाणी उतरले की रात्रीच्या वेळी विद्युत पंप चालू करून पिकांना पाणी द्यावे लागते .मात्र शिवारात लोंबकळनाऱ्या तारा .वाकलेले पोल . फ्यूजवीणा ट्रान्सफॉर्मर आणि या ट्रान्सफॉर्मर ला वेलिंचा पडलेला विळखा त्यामुळे कधी आणि कोठे विद्युत सप्लाय उतरेल याची खात्री नाही वीज वितरण कंपनीला गावं शिवरातून वीज पुरवठ्याच्या मोबदल्यात मोठा महसूल मिळतो .मात्र त्यातुलनेत या कंपनीचे कर्मचारी नाहीत की व्यवस्थित साहित्य नाही .शिवारातील पाच नंबर ट्रान्सफॉर्मर ची अवस्था तर न विचारलेली बरी .कधी पोल कोसळतील किंवा विद्युत तारा जमिनीवर आडव्या पडतील याचा भरवसा नाही. त्यातच ट्रान्सफॉर्मर च्या तुटक्या पेट्या .त्यात फ्युज चा तर पत्ताच नाही .त्यामुळे नुसती वायर लावून पुरवठा सुरळीत करावा लावत आहे त्यात विजेचा लपंडाव ठरलेला .मात्र त्याही परिस्थितीत जीव मुठीत धरून शेतकरी रात्रीचा दिवस करीत पीके वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत .वीज वितरण कंपनीने शेतीसाठी सुरळीत आणि दिवसा वीज पुरवठा करावा अशी मागणी वारंवार होत आहे

# चंद्रकांत दसले यांनी मोहोळच्या संघाचा सलग दोन सेट मध्ये २-० ने विजय संपादन

सोलापूर/प्रतिनिधीः ०१ इन्फिनिटी बॅडमिंटन अकॅडमी आयोजित जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत ४५+ वयोगटात डबल्स मध्ये अमोल कोकाटे व चंद्रकांत दसले यांनी मोहोळच्या संघाचा सलग दोन सेट मध्ये २-० ने अंतिम सामन्यात पराभव करून विजय संपादन केला. विजय खेळाडूंना ट्रॉफी व रोख पारितोषिक इन्फिनिटी बॅडमिंटन अकॅडमी चे संचालक श्री अमित नन्ना यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.या वितरण समारंभास लोकमंगल बँकेचे संचालक अतुल कोकाटे , रेणुक मंगरूळे व समीर शेख उपस्थित होते.

